**कृपया प्रसिध्दीसाठी** **8 एप्रिल 2009**

## भाजपा नेते व भाजपा - शिवसेना युती व मित्र पक्षांचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांनी बुधवार, 8 एप्रिल 2009 रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *शरद पवारांनी केली मच्छिमारांची घोर फसवणूक : राम नाईक*

**मुंबई, बुधवार:**"कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी देशभरातील मच्छिमारांची घोर फसवणूक केली असून डिझेलवर मिळणारा परतावा रद्द करण्यात आला आहे. येत्या निवडणुकीत त्याचे परिणाम केवळ राष्ट्रवादी काँग्रेसलाच नव्हे तर युपीएला समुद्र किनारा असलेल्या सर्व राज्यांमध्ये भोगावे लागतील," अशी टीका भाजपा नेते व भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा क्षेत्राचे उमेदवार श्री. राम नाईक यांनी आज मुंबई येथे केली. मच्छिमारांना डिझेलवर मिळणारा कर परतावा यापुढे फक्त गरीबी रेषेखालील मच्छिमारांनाच देण्याचा केंद्र सरकारचा निर्णय म्हणजे सध्या मिळणारा कर परतावा रद्द करण्याचाच निर्णय आहे. हा 'तुघलकी' निर्णय असून मत्स्य दुष्काळ, महागाई व मंदीमुळे होरपळणा-या मच्छिमारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे असे यावेळी श्री. नाईक म्हणाले.

मच्छिमारांना डिझेलवरील कर परतावा वाढवून देणे तसेच शेतकऱ्यांप्रमाणे अल्प दराने कर्ज पुरवठा व अन्य काही प्रश्नांच्या संदर्भात श्री. राम नाईक यांनी केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांना प्रथमतः 2007 मध्ये पत्र लिहिले, 23 ऑक्टोबर 2007 रोजी प्रत्यक्ष चर्चाही केली. या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. शेवटचे पत्र 20 फेब्रुवारी 2009 रोजी पाठविले. परंतु मच्छिमारांच्या या सर्वच समस्यांबाबत कृषि मंत्री श्री.शरद पवार आणि युपीएच्या केंद्र सरकारने केवळ निराशाजनकच नव्हे तर संतापजनक निर्णय घेतले आहेत. याबद्दल अधिक माहिती देताना श्री. नाईक म्हणाले "प्रा. मधु दंडवते अर्थमंत्री असताना अर्थ संकल्पाच्या चर्चेत मी प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी 1990 पासून छोटया मच्छिमारांना मदत म्हणून डिझेलच्या अबकारी करावर प्रति लीटर 35 पैसे परतावा देण्याची घोषणा त्यांनी केली . श्री. राजनाथ सिंह कृषिमंत्री व मी पेट्रोलियम मंत्री असताना आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेल्या पेट्रोलीयम पदार्थांच्या किमतींमुळे हा कर परतावा प्रति लीटर रु. 1.50 पर्यंत वाढविण्यात आला. त्यानंतर सत्तेवर आलेल्या युपीए सरकारने पेट्रोल-डिझेल प्रचंड महाग केले. भरीस भर मच्छिमारांना देशभर मत्स्यदुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. म्हणूनच महागलेल्या डिझेलवरचा कर परतावा रु. 4/- पर्यंत वाढविल्यास मच्छिमारांना दिलासा मिळेल अशी मागणी मच्छिमार संघटनांच्यावतीने मी केली होती. कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी यासंबंधी घेतलेले निर्णय नुकतेच एका पत्राद्वारे कळविले आहेत. हा कर परतावा प्रति लीटर रु.3 पर्यंत वाढवित असल्याचे कळविले आहे. प्रत्यक्षात मात्र ही बातमी मच्छिमारांसाठी खूषखबर नसून त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.

कारण आधीची सवलत सर्व छोटया मच्छिमारांना होती, तर आताची सवलत केवळ दारिद्रय रेषेखालील मच्छिमारांनाच मिळणार आहे. "स्वतःची छोटी बोट असलेला आणि दारिद्रय रेषेखाली असणारा एक तरी मच्छिमार श्री. शरद पवार यांनी दाखववावा" असे आव्हान आपला संताप व्यक्त करताना श्री. राम नाईक यांनी दिले आहे.

मासेमारी ही मत्स्य शेतीच मानली जाते म्हणूनच ती कृषि खात्यांतर्गत येते. त्यामुळेच शेतक-यांप्रमाणेच मच्छिमारांनाही राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून (एनसीडीसी) चार टक्के व्याज दराने कर्ज मिळावे अशीही मागणी मच्छिमारांच्या शिष्टमंडळाने श्री.राम नाईक यांच्यामार्फत केली होती. श्री. पवार यांनी या मागणीला प्रत्यक्ष चर्चेत सकारात्मक प्रतिसाद दिला. परंतु प्रत्यक्षात मच्छिमारांनी त्यांच्या सहकारी संस्थाकडून कर्ज घ्यावे. या संस्थांना एनसीडीसी व्यापारी दराने कर्ज देते असे श्री. शरद पवार यांनी श्री. नाईक यांना कळवून मच्छिमारांच्या या मागणीलाही झिडकारले आहे. सध्या मच्छिमारांना 12 ते 14 टक्के व्याज दराने कर्ज मिळते.

समुद्राच्या पूर्णतः आर्थिक विभागात (एक्सक्यूझिव इकॉनॉमिक झोन - ईईझेड) कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सध्या कोणताही कायदा अस्तित्वात नाही. यावर तोडगा म्हणून समुद्रातील कायदा व सुव्यवस्थेसाठी नवा कायदा करण्यात यावा, अशीही मच्छिमारांची मागणी होती. अलिकडेच मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमुळे तरी या मागणीचे गांभीर्य काँग्रेस सरकारला कळायला हवे होते. परंतु या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अजूनही या संबंधात कायदा बनविण्यासाठी विविध मंत्रालयांचा एकत्र विचार सुरु असल्याचे श्री. पवार यांनी कळविले आहे. "देशातील नागरिकांच्या सुरक्षेची या सरकारला काडीमात्र पर्वा नाही हेच यावरुन सिध्द होते," असे मत यावेळी श्री. नाईक यांनी व्यक्त केले.

देशभरात वेगवेगळया राज्यांत मच्छिमारी बंदरांचा जाणीवपूर्वक विकास केला जात आहे. महाराष्ट्रातही ठाणे जिल्हयातील अर्नाळयासह मिरकरवाडा (रत्नागिरी), देवगड (आनंदवाडी), साखिनाते, हर्णे, करंजा, जीवना, आगरदांडा या आठ बंदरांचा विकास करण्याची योजना गेली अनेक वर्षे फक्त चर्चेत आहे. त्याबद्दल निर्णय घेऊन तो राबविण्यासाठी केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाची मागणी मच्छिमार करीत होते. परंतु प्रत्यक्षात आठपैकी देवगड (आनंदवाडी) या एकाच बंदराच्या विकासाला श्री. पवार यांनी हिरवा कंदिल दाखविला आहे, अन्य बंदरांचा अद्याप तांत्रिक अभ्यासही पूर्ण झालेला नाही असा गौप्यस्फोटही श्री.राम नाईक यांनी केला.

नव्याने कार्यान्वित तारापूर अणु उर्जा विस्तार प्रकल्प 3 व 4 मुळे तेथील समुद्रात मोठया प्रमाणावर गरम पाणी सोडण्यात येते. त्यामुळे मत्स्य प्रजननावर दुष्परिणाम झाल्याची तक्रार तेथील मच्छिमार करीत आहेत. या पाण्याची पाहाणी मच्छिमारांना सोबत घेऊन करावी अशीही मच्छिमारांची मागणी

होती.  परंतु तसे न करताच सोडण्यात येणारे गरम पाणी हे कमाल मर्यादेच्या आतच असते असा पर्यावरण मंत्रालयाचा अभिप्रायही श्री. पवार यांनी ग्राहय धरला आहे.

"श्री. शरद पवार यांच्या या सर्व निर्णयांमुळे महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशातील मच्छिमार युपीए सरकारवर संतापतील आणि आपल्या मतदानाने युपीए सरकारला धडा शिकवतील," असा ईशाराही श्री. राम नाईक यांनी  दिला आहे.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी क्र 9867689540**